# प्रेस नोट

पोलीस अधीक्षक कार्यालय, लोहमार्ग पुणे
दिनांक:— २९/०५/२०१८

## पुणे लोहमार्ग जिल्हा पोलीस दलाचे नव्या संकेतस्थळाचे लोकार्पण (www.punerailwaypolice.gov.in)

पुणे लोहमार्ग जिल्हा पोलीस दलाच्या नव्या संकेतस्थळाचा लोकार्पण आज दि. २९/०५/२०१८ रोजी पोलीस अधीक्षक सो. श्री. डॉ. प्रभाकर बुधवंत, यांचे शुभहस्ते करण्यात आले. पुणे लोहमार्ग जिल्हा पोलीस दलाचे जुने संकेतस्थळ हे संगणकावरच ओपन करण्यापर्यंत मर्यादित होते, परंतु नुतनीकरण केलेले **www.punerailwaypolice.gov.in** संकेतस्थळ हे अॅडव्हॉन्स इन्क्रीप्शनव्दारे तयार केल्याने ते सहज मोबाईल, टॅब, आयपॅड यासारख्या आधुनिक उपकरणामध्येही सहजपणे ओपन केले जाऊ शकते. तसेच त्यामध्ये सायबर सुरक्षेवर विशेष भर देण्यात आलेला आहे. नुतनीकरण केलेले संकेतस्थळ हे नागरिकांना सहज हाताळणे योग्य ( User Friendly ), लोकाभिमुख बनविण्यात आलेले आहे.

यापुर्वीच्या संकेतस्थळ फक्त इंग्रजी भाषेमध्ये तयार करण्यात आले होते. त्यावर माहितीचा अधिकार, पोलीस भरतीविषयक माहिती, पोलीस विभागाचे विविध उपक्रम, जनतेसाठी उपलब्ध होते. तर नुतनीकरण केलेले नवीन संकेतस्थळ **इंग्रजी तसेच मराठी भाषेमध्ये** तयार करण्यात आलेले आहे. ते डेस्कटॉप, लॅपटॉप, टॅब, मोबाईलवर उपलब्ध होऊ शकणार आहे. यात नागरिकांना अभिप्राय, हरविलेल्या/सापडलेल्या वस्तुंची तक्रार देण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच यात सिटीझन अलर्ट वॉलवर पोलीसांनी टाकलेली माहिती नागरिक बघु शकतात. नव्या वेबसाईटवर जिल्हा पोलीस दलातील पोलीस स्टेशन यांचे अधिकारी व महत्वाचे संपर्क क्रमांक तसेच नागरिकांना नजिकच्या पोलीस स्टेशनची माहिती तात्काळ उपलब्ध होऊ शकणार आहे. संकेतस्थळावर अनोळखी मृतदेह तसेच हरविलेल्या व्यक्तिची माहिती पाहायला मिळणार आहे. विशेषत: अंध व्यक्तींना Screen Reader Software चा वापर करुन सदरचे संकेतस्थळ वापरण्यास सोपे आहे.

तरी नागरिकांनी या नवीन संकेतस्थळाचा वापर करुन त्याची मदत घ्यावी.